साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–महाविर नत्थुजी कुडमथे,
वय २५ वर्ष, व्यवसाय–चालक
राह.मुरादपुर, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू</u>**

१. घटना दि.१७/०६/२०२२ रोजीची आहे. सदर दिवशी मी बेला येथे आलो होतो व घराकडे जात होतो त्यावेळी झाडे चौक येथे एका मुलाचा अपघात झाला होता त्याचे नाव आयुष सुर्यभानजी मडावी असे होते. त्यानंतर मी त्याला पि.एच.सी.बेला येथे उपचारासाठी नेले. सदरचा अपघात कसा झाला होता हे मला माहित नाही. परंतु, मी तेथे आलो होतो.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी बेला येथुन माझे काम आटपुन येत असतांना जखमी आयुष मडावी हा त्याच्या मो. सा.ने जात असतांना त्याच्या समोरून एक मो.सा. चालक येऊन त्याने त्याच्या ताब्यातील मो. सा. चालवत आणुन सदर जखमी आयुष याच्या मो.सा. ला धडक देउन अपघात केला. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी माझी मो. सा. थांबवुन जखमी आयुष मडावी याच्याजवळ गेलो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी जखमी आयुष मडावी याच्या ओठाला, खांद्याला, डोक्याला आणि हाताला मार लागलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी जखमी आयुष याला सरकारी दवाखान्यात उपचाराकरिता घेउन गेलो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी सदर अपघाताची माहिती जखमी आयुष याच्या काकाला व वडीलांना दिली.

३. हे म्हणणे खरे आहे की, जखमी आयुष याला राजु देशमुख या मो.सा. चालकाने त्याच्या मो.सा.ने धडक दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर राजु देशमुख याची मो.सा.ही भरधाव वेगात व निष्काळीपणाने चालवित होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अपघात हा आरोपी राजु देशमुख याच्याच चुकीमुळे झालेला आहे. आरोपीला पाहिल्यास मी ओळखतो आरोपी न्यायालयात हजर नाही. त्याच्या गैरहजेरीचा अर्ज नि.क्र.१९ वर दाखल, मंजुर, ओळखीबाबत तक्रार नाही.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. पि.वाय.सुखदेवे यांनी नि.क्र.१८ वर मेमो दाखल केला त्याप्रमाणे यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरू.</u>**

४. पोलिसांनी माझे बयाण घेतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेविषयी स्वत: पोलिसांना माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, समोरचे वाहण हे भरधाव वेगात होते व हयगयीने चालवित होते या बाबी मी पोलिसांना सांगितल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदरची घटना ही आरोपी राजु याच्या चुकीमुळे झाली ही बाब मी पोलिसांना सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी घटना घडल्यानंतर काही वेळाने घटनास्थळावर आलो, त्यामुळे मी सदर घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटना मी प्रत्यक्ष न पाहिल्याने कोणाच्या चुकीमुळे घडली हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेबाबत जखमी आयुष याच्या काकाला व वडीलांना कळविले नव्हते. आयुष हा माझा गावनात्याने परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी आयुश याच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आयुश याला प्राथमिक आरोग्य केंद्र, बेला येथे नेले नव्हते.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.११.०२.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड